# बेपर्वा अमेरिका

*सिरियामध्ये ट्रम्प यांनी घडवलेल्या सैनिकी कारवाईमुळे सलाफी जिहादी शक्तींचा जोर वाढणार आहे.*

साम्राज्यवादाचा नैतिक बुरखा नेहमीच 'मानवतावादा'चा राहिलेला आहे. अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष एकीकडे उघडपणे सैनिकीकरण, वंशद्वेष व राष्ट्राविषयीचा दुराभिमान यांचा कडवेपणानं पुरस्कार करत असतात आणि दुसरीकडे अमेरिकी साम्राज्यवादाची जुनीपुराणी नैतिक भाषा करत आपल्याला पाठिंबादेखील मिळवत असतात. १९६१ ते १९७१ या काळात झालेल्या व्हिएतनाम युद्धादरम्यान 'ऑपरेशन रँच हँड'मधे अमेरिकी सैन्यानं 'एजन्ट ऑरेन्ज'चा वापर केला, ते अशा 'नैतिक' वक्तव्यांच्या वेळी विसरायचं असतं!

सिरियाच्या सरकारनं रासायनिक अस्त्रांद्वारे हल्ला केला होता, हे तातडीनं प्रस्थापित करण्याचं काम अमेरिकी राष्ट्राध्यक्षांच्या प्रशासनानं केलं. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचं मत काय आहे किंवा निःपक्षपाती तपासातून काय हाती लागतं, यासाठी थांबण्याची गरज अमेरिकी सरकारला वाटली नाही. त्यांनी प्रस्थापित केलेला 'निवाडा' कॉर्पोरेट माध्यमांद्वारे मोठ्या प्रमाणात प्रसृत करून नंतर शक्य तितक्या लवकर 'शिक्षे'ची अंमलबजावणी करणं, अशा प्रकारे ही प्रक्रिया पार पडली.

सिरियात गेली सहा वर्षं हे यादवी युद्ध सुरू आहे. तिथल्या इतलिब प्रांतातील बंडखोरांच्या अधिपत्याखालील खान शेखाउन शहरावर रासायनिक अस्त्रांचा हल्ला ४ एप्रिलला झाला. व्हाइट हाउसनं तत्काळ राष्ट्राध्यक्ष बशर अल-अस्साद यांच्या सरकारचा या हल्ल्यासाठी निषेध केला. प्रसारमाध्यमांनी आणि जवळपास सर्व राजकीय व्यवस्थेनं सिरियाच्या सरकारला गुन्हेगार ठरवलं. दुसऱ्या दिवशी, विषारी वायूमुळं मृत्युमुखी पडलेली 'निरपराध मुलं, निरपराध बालकं' यांच्या प्रतिमांकडे पाहून अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तीव्र भयाची भावना व्यक्त केली. आता सहनशीलतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या गेल्याचं त्यांनी जाहीर केलं. सैनिकी कारवाईच्या संभाव्यतेचा विचार करण्यासाठी त्यांनी राष्ट्रीय सुरक्षा मंडळाची बैठक घेतली. त्यानंतरच्या दिवशी भूमध्य समुद्रातील दोन अमेरिकी युद्धनौकांनी सिरियातील होम्स शहराजवळच्या शायरत हवाईतळावर ५९ 'टोमाहॉक' क्षेपणास्त्रं डागली.

'आमच्या लोकांना लक्ष्य करणाऱ्या दहशतवाद्यांच्या विरोधातही सिरियन अरब सैन्यानं अशी अस्त्रं वापरलेली नाहीत आणि भविष्यातही वापरली जाणार नाहीत', असं सिरियाचे परराष्ट्र मंत्री वालीत अल मुआल्लेम यांनी त्यांच्या सरकारवरील आरोपांना उत्तर देताना स्पष्टपणे सांगितलं. परंतु प्रस्थापित सत्ता आणि प्रसारमाध्यमांनी त्यांच्या खुलाशांकडे सहज दुर्लक्ष केलं. या उलट, संयुक्त राष्ट्रांमधील अमेरिकी प्रतिनिधी निक्की हेली यांच्या विधानांना या माध्यमांनी मोठी प्रसिद्धी दिली. सिरियाविरोधात 'संयुक्तरित्या कृती करण्याचं कर्तव्य पार पाडण्यामध्ये आंतरराष्ट्रीय समुदायाला सातत्यानं अपयश येत असल्यामुळं' अमेरिकेला त्या देशाविरोधात युद्ध सुरू करण्याचा अधिकार आहे,

असं त्यांनी सूचित केलं. साहजिकपणे सिरियावरील सैनिकी हल्ल्यांसाठी ट्रम्प यांचं अमेरिकेतील कॉर्पोरेट माध्यमं व राजकीय व्यवस्थेनं कौतुक केलं. परराष्ट्र कामकाजासंबंधी 'सीएनएन' वाहिनीवरील आघाडीचा कार्यक्रम चालवणारे फरीद झकारिया अगदी अलीकडेपर्यंत नवीन राष्ट्राध्यक्षांवर टीका करत होते, पण या सैनिकी कारवाईनंतर तेही ट्रम्प यांचं लांगुलचालन करू लागलेले दिसले. सिरियावर क्षेपणास्त्र हल्ला करून 'ट्रम्प हे युनायटेड स्टेट्सचे राष्ट्राध्यक्ष बनले आहेत', असं झकारियांनी जाहीर केलं.

अमेरिकी साम्राज्यवादाची ही जुनीच क्लृप्ती नेहमीप्रमाणे आतल्या गोटातून बाहेर काढण्यात आली. १९९१ साली तेलश्रीमंत इराकवर अमेरिकेनं विनाशकारी हल्ला केला, तेव्हा कुवेतमधील जनतेवर इराकी सैन्यानं कथितरित्या हल्ल्याची योजना बनवल्यानं त्याला प्रतिकार म्हणून अमेरिकेनं हस्तक्षेप केल्याचं सांगण्यात आलं. १९९९ साली युगोस्लावियावर नाटोच्या दलांनी बॉम्बहल्ला केला, तेव्हा तिथले राष्ट्राध्यक्ष स्लोबोदान मिलोसेविक वांशिक कत्तलीची योजना करत असून ती रोखण्यासाठी हल्ला केल्याचं सांगण्यात आलं. २००१ साली अफगाणिस्तानचा विध्वंस करतानाही असंच समर्थन देण्यात आलं; ११ सप्टेंबर २००१ रोजी हल्ला घडवणाऱ्यांना तालिबानी सरकार पाठीशी घालत असल्याचा दावा त्या वेळी करण्यात आला. त्यानंतर २००३ साली इराकी राष्ट्राध्यक्ष सद्दाम हुसेन यांच्याकडे 'जनसंहारक अस्त्रं' असल्याचा दावा करून इराकवर हल्ला चढवण्यात आला. २०११ साली नाटोच्या नेतृत्वाखालील दलांनी लिबियामध्ये सैनिकी हस्तक्षेप केला; नाटोच्या 'इस्लामी प्रतिनिधी' दलांनी राष्ट्राध्यक्ष मुआम्मर गद्दाफी यांची हत्या केली. बेन्घाझीमध्ये गद्दाफींची दलं मोठ्या प्रमाणात कत्तल घडवणार होती, म्हणून ही कारवाई केल्याचं सांगण्यात आलं.

आपली भूराजकीय आकांक्षा पुढं रेटण्यासाठी धार्मिक मूलतत्त्ववाद्यांना पैसा व शस्त्रं यांचा पुरवठा करणं, त्यांना चालना देणं या अमेरिकेच्या क्लृप्तीची एक दीर्घकालीन रचना दिसते. १९५०च्या दशकात अरब राष्ट्रवाद्यांच्याविरोधात अमेरिकेच्या 'सेंट्रल इन्टेलिजन्स एजन्सी'नं 'मुस्लीम ब्रदरहूड' या संघटनेशी संगनमत केलं होतं आणि १९८०च्या दशकात सोव्हिएत रशियाविरोधात मुजाहिदीनांना अमेरिकेनं शस्त्रं पुरवली होती. सहा वर्षं सुरू असलेल्या सिरियातील यादवी युद्धामध्येही अशाच कुटील क्लृप्त्या खेळल्या जात आहेत. इस्लामिक स्टेट (इसिस) व अल कायदा यांसारख्या सलाफी जिहादी गटांना आणि इराक व सिरियातील त्यांच्या संलग्न संघटनांना धार्मिक प्रेरणा देण्याचं काम सौदी अरेबियातील अधिकृत सरकारी धर्म असलेला वहाबी पंथ करतो आहे (सुन्नी इस्लामचा हा एक पंथ आहे, यात शुद्धतावादी व अतिसनातनी वृत्ती आहेत). उदाहरणार्थ, 'सीआयए'चं पाठबळ असलेली अल-कायदाची जभात अल नुसरा ही सर्वांत बलवान बंडखोर संघटना सिरियात अस्साद यांच्या सत्तेला आव्हान देते आहे.

वहाबी विचारधारेपुरतीच ही समस्या मर्यादित नाही, तर अमेरिकी साम्राज्यवादाच्या संकुचित ध्येयप्राप्तीसाठी सलाफी जिहादी गटांना पैसे व शस्त्रांचा पुरवठा केला जातो, हा गंभीर प्रश्न आहे. सिरियामध्ये अमेरिकी साम्राज्यवादाचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेल्या विविध सलाफी जिहादी गटांना दिला जाणारा पाठिंबा अमेरिकेनं, सौदी अरेबियानं व आखातातील इतर देशांनी थांबवावा, अशी मागणी संयुक्त राष्ट्रांनी करायला हवी. प्रामाणिकपणे विश्लेषण केलं तर अमेरिकेच्या या साम्राज्यवादी क्लृप्त्याच सिरियातील सध्याच्या संकटाच्या मुळाशी असल्याचं दिसेल, शिवाय एकविसाव्या शतकातील सर्वांत भीषण रूप धारण

केलेल्या निर्वासितांच्या समस्येमागचंही एक कारण हेच आहे. ट्रम्प यांच्या कारवाईमुळं सलाफी जिहादी दलांना आणखी सैनिकी पाठबळ मिळेल आणि परिणामी सिरियन यादवी युद्धामध्ये अस्साद यांना मिळणारा रशिया व इराणचा पाठिंबा आणखी बळकट होईल. अखेर नागरिकांवरील अत्याचार वाढतील आणि निर्वासितांच्या ताणामध्ये आणखी भर पडेल. ●

---

## काश्मीरकडून मिळालेला स्पष्ट संकेत

*अलीकडे काश्मीरमधील एका संसदीय पोटनिवडणुकीवर जवळपास पूर्ण बहिष्कार टाकण्यात आला. यावरून भारतीय राज्यसंस्थेकडून तिथल्या नागरिकांची किती मोठी निराशा झाली आहे, ते स्पष्ट दिसतं.*

काश्मीर खोऱ्यातील निवडणुकांमध्ये लोकांचा मोठा सहभाग असतो, यावरून तिथल्या लोकांच्या मनोवस्थेचा अंदाज बांधण्याचं काम भारतीय दीर्घ काळ करत आले आहेत. मतदानाची आकडेवारी पाहताना निवडणुकांवर बहिष्कार टाकलेल्यांची संख्या आपण मोजली नाही. आपण बळाचा क्रूर वापर करूनही काश्मिरी जनता घराबाहेर येऊन मतदान करेल, यावर विश्वास ठेवण्याची सवय आपल्याला लागली होती. ९ एप्रिल रोजी श्रीनगर संसदीय मतदारसंघाच्या निवडणुकीत केवळ ७.१४ टक्के लोकांनी मतदान केलं, आणि त्या दिवशी झालेल्या हिंसाचारात आठ तरुण निदर्शकांचा मृत्यू झाला तर २०० जण जखमी झाले. या वस्तुस्थितीकडे लक्ष दिल्यास खरं चित्र स्पष्ट होतं. भारताच्या घटनात्मक संस्थांविषयी काश्मिरींना निराशा वाटते आहे, हे यातून स्पष्टपणे दिसतं. स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा व संसदीय पातळीवर निवडणुकांसाठी काश्मीरमध्ये होणाऱ्या मतदानात मोठी तफावत असते, हे आपण समजून घ्यायला हवं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सर्वाधिक मतदान होतं आणि संसदीय निवडणुकांमध्ये सर्वांत कमी मतदान होतं. या संस्थांवर आणि त्यांच्या राजकीय प्रस्तुततेवर काश्मिरींना कितपत विश्वास आहे, हे यातून दिसतं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सर्वाधिक मतदान होतं, कारण दैनंदिन प्रश्नांवर तोडगा काढण्याची इच्छा तिथल्या जनतेमध्ये जागी आहे. राजकीय समस्या न सोडवता कित्येक दशकं सुरू असलेल्या दमनातून होणाऱ्या विध्वंसक परिणामांची तीव्रता कमी करण्याचं काम केवळ राज्य सरकार करू शकतं, हे माहीत असल्यामुळं काश्मिरी जनता विधानसभेच्या निवडणुकांमध्ये मतदान करते. संसदीय निवडणुकांसाठीचं मतदान यापेक्षा भिन्न स्वरूपाचं असतं. बहुसंख्य काश्मिरींच्या दृष्टीनं भारतीय संसदेचं महत्त्व १९९३ सालीच संपुष्टात आलं. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, असं भारतीय संसदेनं त्या वेळी एकमुखानं म्हटलं होतं. शिवाय, पाकिस्तानच्या अधिपत्याखालील भूभागावरील आपल्या दाव्याचीही पुनरुक्ती केली होती. याच वेळी भारतीय संसदेनं काश्मिरींचं सैन्याकडून होणारं दमन व त्यांच्या लोकशाही मागण्या यांच्याकडंही दुर्लक्ष केलं. काश्मीरमधील राजकीय समस्या सोडवण्यासाठी भारतातील विद्यमान वा गतकालीन सरकारांपैकी कुणीही गंभीर राजकीय वाटाघाटींसाठी प्रयत्न केले नाहीत. घटनात्मक स्वायत्ततेचा गाभा काढून टाकल्यावर १९६४ साली केंद्र सरकारनं संसदेत स्वतःची पाठ थोपटली, त्यामुळं आता काश्मीरमध्ये आणि बहुधा भारतातही या स्वायत्ततेच्या मुद्द्याला फारसे समर्थक उरलेले

नाहीत.
सरकारी युक्तिवादाच्या कक्षेत पाहिलं तरी १९९८ सालापासून काश्मीर खोऱ्यातील संसदीय निवडणुकांमध्ये लोकांना रस उरला नसल्याचं दिसतं आहे. गेली दोन दशकं सुमारे ७० ते ८० टक्के जनता मतदानावर बहिष्कार टाकत आली आहे. २०१४ साली ही आकडेवारी ७४ टक्के होती आणि आता ती ९३ टक्क्यांवर पोचली आहे. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार सत्तेत आल्यापासून भारताच्या बाजूचा काश्मिरी मतदारवर्ग वेगानं रोडावल्याचं यावरून दिसतं. 'दहशतवाद किंवा पर्यटन' यांच्याविषयी शब्दबंबाळपणा करून भारतातील असहिष्णू व दुराभिमानी लोकांना नरेंद्र मोदी आकर्षित करत असतीलही, पण काश्मीरमध्ये अशा धोरणाचा काहीही उपयोग नाही.
काश्मीरमधील सर्व समस्यांच्या पाठीमागं पाकिस्तान आहे, या स्वतःच्या मांडणीवर सरकारचाही विश्वास बसत चालला आहे; आणि पर्यटन व तरुणांना रोजगार हे या समस्येवरचे उपाय आहेत, असंही सरकारला वाटतं आहे, ही शोकांतिका म्हणावी लागेल. प्रस्थापित व्यवस्थेमध्ये महत्त्वाचं स्थान असलेल्या लोकांनीही या युक्तिवादावर प्रश्नचिन्ह उमटवलं आहे. केंद्रीय मंत्री, माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार व भारतीय सेनाधिकारी अशा विविध व्यक्तींनी काश्मीरविषयीच्या सरकारी भूमिकेविषयी चिंता व्यक्त केली आहे. तिथल्या सशस्त्र बंडखोरीच्या स्थानिक मुळांकडे त्यांनी लक्ष वेधलं आणि सहेतूक राजकीय संवादाची सुरुवात व्हावी असं मतही मांडलं. दुर्दैवानं, दिल्लीतील सरकारला अजूनपर्यंत काश्मीर धोरणाबाबत शहाणपण आलेलं नाही.
काश्मिरी हे पाकिस्तानची प्यादी म्हणून कार्यरत आहेत आणि स्वतःच्या 'मुस्लीमत्वा'चा ते सतत जयघोष करत असतात, असे दोषारोप धोरणकर्ते व मतकर्ते करत असतात. परंतु भारतीय राज्यसंस्थाच भारतातील मुस्लिमांविरोधात निर्णायकरित्या कार्यरत आहे, हे मात्र ही मंडळी मान्य करत नाहीत. 'जम्मू चेम्बर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'चे अध्यक्ष राकेश गुप्ता यांचं ताजं विधान या संदर्भात पाहाता येईल. रोहिंग्या व बांग्लादेशी मुस्लिमांना 'शोधून मारून टाकावं' असं आवाहन या गुप्तांनी केलं आहे. हा केवळ सुटा प्रसंग नाही. भारताच्या विविध भागांमध्ये मुस्लिमांविरोधात केल्या जाणाऱ्या वक्तव्यांचं प्रतिबिंबच यात पडलेलं आहे.
काश्मीरच्या रस्त्यांवरील भावना रोषाची आणि विद्रोहाची आहे, हेही लक्षात घ्यायला हवं. गोळ्या व छर्रे यांनी अनेकांना जखमी केलं आणि अनेकांना यात प्राणही गमवावे लागले. पण त्या शिवाय, भारत सरकारला केवळ सशस्त्र बंडखोरीचीच भाषा समजते, यावर काश्मिरी जनतेचा– विशेषतः तरुणांचा ठाम विश्वास बसण्यासाठी या कारवाया कारणीभूत ठरल्या. चकमक सुरू असतानाच त्या ठिकाणी लोक मोठ्या संख्येनं जमा होतात आणि सशस्त्र मार्गावर चालणाऱ्या आपल्या निकटवर्तीय व्यक्तींचा बचाव करत त्यांना पाठिंबा देतात, असं चित्र सर्रास दिसतं. हिंदू बहुसंख्याकवादी वर्चस्वाखाली भारतासोबत राहणं हे आपल्या अस्तित्त्वालाच बाधा आणणारं आहे, ही काश्मिरींची भावना या कृतींमधून दिसते. सरकारी प्रचारयंत्रणा काहीही सांगत असली तरी काश्मिरी तरुण केवळ काही शेकडा रुपयांसाठी स्वतःला मृत्यूच्या दाढेत ढकलत नाहीयेत. आपल्या 'आझादी'चा मुद्दा गांभीर्यानं घेतला जावा, आपल्या मागण्यांकडे लक्ष दिलं जावं यासाठी दुसरा कोणताच मार्ग उरलेला नाही, या भावनेनं हे तरुण बंदुका उचलत आहेत. जम्मूतील गोरक्षकांच्या कारवाया, 'अशांत प्रदेशां'मध्ये शस्त्रांचं प्रदर्शन भरवण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला देण्यात आलेली परवानगी, सप्टेंबर २०१४मधील प्रलयंकारी पुराचा फटका बसलेल्यांच्या

पुनर्वसनासाठी जाणीवपूर्वक करण्यात आलेला विलंब, ८ जुलै २०१६ रोजी बुऱ्हान वाणीची हत्या झाल्यावर नागरिकांवर झालेले अत्याचार– या घटनांकडे पाहिलं की लोकांमधील रोष आणि निराशेची भावना सकारण असल्याचं लक्षात येतं. काश्मीरच्या समस्येची मुळं पाकिस्तानात नाही तर आपल्यामध्येच रुजलेली आहेत, हे भारतीयांनी वेळीच समजून घ्यायला हवं. भारत व भारतीय नागरी समाजाविषयीची काश्मिरींच्या मनातील निराशा वाढली आहे हे साधं सत्य स्वीकारायला आपण सामूहिकरित्या नकार देतो आहोत. अलीकडच्या संसदीय पोटनिवडणुकीवर ९३ टक्के मतदारांनी टाकलेला बहिष्कार पुन्हा एकदा काश्मिरींची व्यथा दर्शवतो आहे. ●

---

## शेतीच्या समस्येवर सोपी उत्तरं नाहीत!

*शेतकऱ्यांच्या खोलवरच्या समस्यांवर कर्जमाफी हा उपाय नाही.*

मॉन्सूननं दाखवलेली चंचलता आणि त्यानंतर आलेले दुष्काळ, पूर व पीकनासाडी यामुळं भारतातील शेतकरी व शेतमजुरांवर दैन्याची कुऱ्हाड कोसळली आहे. परंतु स्वातंत्र्यानंतरची गेली सात दशकं ही परिस्थिती नियमितपणे अशीच राहात आलेली आहे. किंबहुना संकट आणखी गडद झालेलं आहे. रचनात्मक समस्यांना सामोरं जाण्यासाठी आवश्यक शेतकी धोरणांची वानवा असल्यामुळं ग्रामीण भारत दुरावस्थेत जगतो आहे. तामीळनाडूतील शेतकऱ्यांनी राजधानीमध्ये गेलं महिनाभर निदर्शनं सुरू ठेवली आहेत. त्यांनी तोंडात साप आणि उंदीर पकडलेले असतात (कारण भूक भागवण्यासाठी त्यांच्या शेतात हेच उपलब्ध आहे), शिवाय वंचनेमुळं मरण पावलेल्या जवळच्या व्यक्तींच्या कवट्याही या निदर्शकांनी सोबत ठेवलेल्या आहेत. या निदर्शनांच्या माध्यमातून शेतीवरील संकट पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलं आहे.

सलग दोन वर्षं दुष्काळी परिस्थिती राहिलेली आहे. नैऋत्य मॉन्सून भारताच्या बहुतांश भागांमध्ये सर्वसाधारण स्वरूपाचा होता, परंतु ईशान्य मॉन्सूननं हुलकावणी दिल्यामुळं देशाच्या काही विशिष्ट भागांमध्ये तीव्र दुष्काळ पडला. केरळ, कर्नाटक, तामीळनाडू, आंध्र प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, उत्तराखंड व मध्य प्रदेश या आठ राज्यांना केंद्र सरकारनं दुष्काळग्रस्त घोषित केलं. तामीळनाडू सरकारनं जानेवारी २०१७मध्ये राज्याला दुष्काळग्रस्त घोषित करून सहकारी बँकांनी लघु व मध्यम पातळीवरच्या शेतकऱ्यांना (म्हणजे राज्यातील एकूण शेतकऱ्यांपैकी ९२ टक्क्यांना) दिलेली कर्जं माफ केली. त्यानंतर सहकारी बँकांनी सर्व शेतकऱ्यांना दिलेली कर्जं माफ करावीत, असा आदेश उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिला (एकूण सहकारी बँकांच्या कर्जांपैकी ३० टक्के कर्जं मोठ्या शेतकऱ्यांना दिलेली होती). आता राष्ट्रीय बँकांमधून घेतलेली शेतकी कर्जंही केंद्र सरकारनं माफ करावीत आणि पीकनासाडीबाबत चांगली भरपाई द्यावी, अशी मागणी तामीळनाडूतील शेतकरी करत आहेत. अलीकडंच सत्तेची सूत्रं हाती घेतलेल्या उत्तर प्रदेश सरकारनं जाहीर केलेल्या पीककर्ज माफीमुळं राज्य सरकारला ३६,३५९ कोटी रुपयांचा तोटा होणार आहे.

या उपायांमुळं शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासादायी आश्वासन मिळतं, पण खोलवर पसरलेलं शेतकी संकट आणि विशेषतः ग्रामीण कर्जबाजारीपणा यांवरचं सर्वगुणकारी औषध म्हणून

हा उपाय कामाचा नाही. आणीबाणीच्या परिस्थितीवरचा तात्कालिक प्रतिसाद एवढंच कर्जमाफीचं स्वरूप आहे. २००८ साली संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारनं मोठ्या प्रमाणात कर्जमाफी करण्याचा कार्यक्रम हाती घेतला होता. त्या वेळी सरकारी तिजोरीला ७० हजार कोटी रुपयांचा भुर्दंड बसला होता. कर्जमाफी टाळता न येणारी असेल तरी ती अंशतः कर्जबाजारीपणापासूनचा एक वेळचा दिलासा आहे. व्यापक प्रसार असलेल्या ग्रामीण कर्जबाजारीपणाला थोपवण्यासाठी याचा काहीच उपयोग होत नाही. सर्वसाधारणपणे फारसं न बोलणारे भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर आणि राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँकेचे प्रमुख यांनीही कर्जमाफीमधील 'नैतिक हानी'संदर्भात वक्तव्यं केलेली आहेत. वेळेवर कर्जाची परतफेड करणाऱ्या प्रामाणिक कर्जदारांवर याचा विपरित परिणाम होईल, असं ते म्हणाले आहेत. कर्जमाफीमुळं कर्जशिस्तीला बाधा पोचते आणि सरकारवरील बोजा वाढतो, यामुळं सरकारकडून घेतल्या जाणाऱ्या कर्जाचा खर्च वाढतो, त्याचा 'परिणाम अखेर राष्ट्रीय ताळेबंदावर' होतो, असं रिझर्व बँकेचे गव्हर्नर उर्जित पटेल म्हणाले.

वस्तुस्थिती साधी-सरळ आहे. नैतिक हानी झाली तरी चालेल पण कर्जमाफीमुळं लोकप्रियता वाढते, अशी राजकारण्यांची धारणा आहे. संयुक्त पुरोगामी आघाडीनं कर्जमाफी योजना अंमलात आणली नसती तर २००९ साली ते पुन्हा सत्तेत आले नसते, असा युक्तिवाद अनेकांनी केलेला आहे. शेतकी कर्जमाफी व सवलतींचा लाभ ग्रामीण भारतातील सर्वांत गरीब असलेल्यांना होत नाही. किंबहुना, भूमिहीन वा अल्पभूधारक अतिधोकाग्रस्त शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणातून मोकळं करण्यासाठी कर्जमाफीचा फारसा फायदा होत नाही. हे शेतकरी कर्ज देण्यासाठी योग्य मानले जात नाहीत, त्यांना संस्थात्मक कर्ज उपलब्धच नसतं, त्यामुळं ते पूर्णपणे सावकारी कर्जावर अवलंबून असतात. भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक समस्यांमध्ये शेतकी संकटाची मुळं रुजलेली आहेत, त्यावर कर्जमाफी हा उपाय नाही. सवलतींचं विषम वाटप, जमीनमालकीची त्रुटीयुक्त रचना आणि सरकारपुरस्कृत शेतीविस्तार कार्यक्रमांमधील घट- या संरचनात्मक समस्या आहेत.

शेतीवरील संकट कालानुसार अधिकाधिक गंभीर बनत चाललं आहे. हवामानबदल आणि टोकाच्या वातावरणाची रचना यांमुळं शेतकऱ्यांच्या असुरक्षिततेमध्ये भरच टाकली आहे. सिंचन व पावसाळी पाण्याचा साठा यांसाठी चांगल्या भांडवली मालमत्तेची उणीव भासते, हे एक मोठं आव्हान आहे. या कारणामुळं सिंचनासाठी शेतकऱ्यांना घटत्या भूजलावर अवलंबून राहावं लागतं. देशातील अर्ध्या शेतजमिनीला शाश्वत सिंचनसुविधेचा लाभ मिळत नाही. आठ दुष्काळग्रस्त राज्यांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेखालील कार्यदिवसांची संख्या प्रतिवर्षासाठी १५० दिवसांपर्यंत वाढवायचा केंद्र सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. पाणी साठवणं, सिंचनात सुधारणा करणं आणि दुष्काळसदृश अवस्थेला रोखणं- यांसाठी आवश्यक मालमत्ता निर्माण करण्याची तातडीची गरज आहे.

भारतीय शेतकऱ्यांच्या 'ताळेबंदा'वर विपरित परिणाम करणारे इतरही अनेक घटक आहे. उत्पादनाचा खर्च वाढतो आहे, परंतु त्यातून मिळणारा परतावा कमी आहे आणि अस्थिरही आहे. भारतातील आणि जगभरातील शेती उत्पादनांच्या बाजारपेठा अपूर्णावस्थेतील आहेत, चंचल आहेत. शेती उत्पन्नात होत असलेली घट आणि ग्रामीण कर्जबाजारीपणा हे प्रश्न या पार्श्वभूमीवर समजून घ्यायला हवेत. व्यवस्थात्मक समस्या सोडवण्यासाठी एकाग्र पद्धतीनं प्रयत्न केले

जात नाहीत, तोपर्यंत हे दुष्टचक्र भेदलं जाणार नाही. कर्जमाफी हा केवळ वरवरचा उपाय आहे. त्यातून तात्पुरता दिलासा मिळतो. परंतु, कायमस्वरूपी उपाय होत नाही. ●

---

## व्यापम : विघातक मौन

*व्यापम घोटाळ्यात बेफिकीरी व बेदरकारपणाच्या भयकारी रूपाची आठवण होते.*

मध्यप्रदेशातील प्रवेश व भरती प्रक्रियेतील (व्यापम घोटाळा म्हणून परिचित असलेल्या) अवैध जाळ्याकडे प्रसारमाध्यमांनी दुर्लक्ष केलं. घोटाळे व फसवणुकीच्या प्रकरणांसाठी हपापलेल्या माध्यमांचं या प्रकरणाबाबतीतलं हे वर्तन बुचकळ्यात टाकणारं आहे. २०१३ साली या घोटाळ्याचा खरा विस्तार उघड झाला, तेव्हापासून या प्रकरणातील ४५ साक्षीदार व आरोपी गूढ परिस्थितीत मृत्युमुखी पडले आहेत आणि इतर दोन हजार आरोपींची तपासणी चालू आहे. राज्याचे मुख्यमंत्री, इतर मंत्री व त्यांचे सहकारी यांच्यापर्यंत या आरोपांची सुई फिरलेली आहे. या प्रक्रियेद्वारे भरती होणारे हजारो व्यावसायिक व डॉक्टर होण्याची आकांक्षा असलेले तरुण या घोटाळ्यामुळं उद्‌ध्वस्त झाले, त्यांची कारकीर्द कोलमडली. पण या संदर्भातील अस्थिर तपासाविषयी कोणत्याही निर्णायक उत्तरांची मागणी राष्ट्रीय माध्यमांनी केलेली नाही. डॉक्टरांवरचा जनतेचा विश्वासही यामुळं कमी झाला आहे. तपासप्रक्रियेवर लक्ष राहील व ठरलेल्या कालावधीमध्ये तपास पूर्ण होईल यासाठी इतर प्रकरणांमध्ये सक्रिय असणारी न्यायव्यवस्थाही याबाबतीत क्रियाशील झाली नाही. 'नियमांचं पद्धतशीर उल्लंघन' केल्याबद्दल मध्य प्रदेश राज्यसरकारवर महाअभिलेखापालांनी (कॅग: कम्पट्रोलर अँड ऑडिटर जनरल) अलीकडेच ताशेरे ओढले. 'भ्रष्ट' काँग्रेसची निर्भत्सना करण्यासाठी तातडीनं पुढाकार घेणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) नेतृत्वानं या बाबतीत मात्र मौन बाळगलं आहे.

कॅगचा अहवाल मार्चअखेरीला राज्याच्या विधानसभेत सादर झाला. घोटाळ्याची बातमी प्रसिद्ध झाल्यावरही व्यावसायिक परीक्षा मंडळाकडून (व्यापम) घेतल्या जाणाऱ्या परीक्षांसाठी कोणतीही नियामक रूपरेषा आखण्यात आली नाही, त्यामुळं प्रवेश व भरतीसाठी अनेक उमेदवारांच्या कारकिर्दीला फटका बसला, याकडे या अहवालात लक्ष वेधण्यात आलं. सरकारी सेवांमधील भरतीसाठी घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांसंबंधी कोणतीही तथ्यमाहिती ठेवलेली नसल्यामुळं 'भरतीप्रक्रिया अपारदर्शकता' निर्माण झाली आहे आणि मंडळाच्या विश्वासार्हतेची हानी झाली आहे, असं अहवालात म्हटलं आहे. व्यापम ही सरकारी संस्था नसल्यामुळं तिचे दस्तावेज कॅगला उपलब्ध करून देण्यास राज्य सरकारनं परवानगी दिली नाही, याबद्दल सर्वाधिक टीका करण्यात आली आहे. खरं तर सर्व व्यावहारिक कामांच्या दृष्टीनं ही संस्था सरकारच्या नियंत्रणाखाली आहे. भरती करण्याचं सगळं काम राज्य सरकारानं राज्य कर्मचारी निवड आयोगाला बाजूला सारून व्यापमकडे दिलं. व्यापमचे अध्यक्ष, संचालक व नियंत्रकही राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांमधून निवडण्यात आले, असं अहवालात म्हटलं आहे.

व्यापमसंबंधित गैरव्यवहारांची माहिती २००९ सालापासून बाहेर येते आहे. फसवणुकीसाठी विविध साधनं वापरणारं विस्तारित स्वरूपाचं जाळं अस्तित्वात असल्याचं जागल्यांनी निदर्शनास आणून दिलं होतं. उमेदवारांची बनावट ओळख तयार करणं, विशिष्ट उमेदवारांना उत्तरं पुरवणं, गुण वाढवण्यासाठी

उत्तरपत्रिकांमध्ये फेरफार करणं आणि अधिक अभ्यास केलेल्या सहउमेदवारांच्या उत्तरांची नक्कल करण्यासाठी कमकुवत उमेदवारांना मुभा देणं, असे विविध मार्ग या प्रक्रियेत वापरण्यात येत होते. या प्रकरणी सुरुवातीला पोलिसांनी तपास केला, त्यानंतर विशेष कृती पथक आणि आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडून तपास सुरू आहे, त्यातून अनेक आरोप व प्रश्न उपस्थित झाले आहेत. परंतु या जाळ्यामागील खरे सूत्रधार कोण आहेत, यासंबंधी निर्णायक स्वरूपाचा अत्यंत अल्पसा पुरावा यातून हाती लागला आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या तपासात वेळकाढूपणा आणि अव्यवस्थितपणा दिसत असल्याची तीव्र टीका होते आहे. जागल्यांनी केलेल्या आरोपांमध्ये मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराज सिंग चौहान आणि राज्यातील इतर विख्यात भाजप नेत्यांचाही समावेश आहे. (चौहान यांनी त्यांच्याविरोधात व त्यांच्या पत्नीविरोधात अशाच प्रकारचे आरोप करणाऱ्या काँग्रेसच्या एका नेत्यावर मानहानीचा खटला भरला होता). परंतु या प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांमध्ये मुख्यत्वे विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा व मध्यस्थांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांनी परीक्षेला बसताना किंवा भरतीच्या वेळी गैरव्यवहारांचा मार्ग पत्करला किंवा त्याला पूरक काम केलेलं आहे. सरकारी नोकऱ्यांसाठीची (यामध्ये कंत्राटी शिक्षकांची संख्या मोठी आहे) उमेदवारांची व वैद्यकीय विद्यार्थ्यांची पात्रता या मंडळानं रद्द केली आहे. त्यामुळं या घोटाळ्याचा विपरित परिणाम सहन केलेल्यांना आणखी पिडलं जात आहे. सरकारी नोकरी मिळवण्यासाठीची प्रक्रिया आधीच भ्रष्ट झाली होती, या प्रक्रियेत असुरक्षिततेमुळं व चिंताग्रस्ततेमुळं सहभागी झालेल्यांना याची शिक्षा होते आहे. व्यापम हा केवळ परीक्षांशी संबंधित घोटाळा नाही तर राज्यसंस्थेच्या पाठिंब्यावर सुरू असलेली ही फसवणुकीची व्यवस्था आहे आणि तिचं रूपांतर आता 'सेवा उद्योगा'त झालेलं आहे. खाजगी घटकांना व्यापक भूमिका पार पाडण्यासाठी अवकाश निर्माण व्हावा म्हणून जाणीवपूर्वक शिक्षणव्यवस्था कमकुवत बनवल्याचा हा परिणाम आहे.

या घोटाळ्यासंबंधी चौकशी करत असलेल्या दिल्लीतील एका वृत्तवाहिनीच्या तरुण पत्रकाराचा मृत्यू झाल्यावर राष्ट्रीय माध्यमांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. एका नियतकालिकानं यासंबंधी तपशीलवार शोधलेखही प्रसिद्ध केला होता. पत्रकारांच्या व न्यायाधीशांच्या सहकारी गृहसंस्थांना सरकारकडून सवलतीच्या दरांमध्ये जमीन मिळाल्याचा उल्लेख या लेखात होता. स्थानिक माध्यमांनी या घोटाळ्याची इतकी कमी दखल घेण्यामागे हा घटक कारणीभूत असू शकतो, असं त्या लेखात सूचित केलं होतं. घोटाळ्याशी संबंधित ४५ मृत्यू (अधिकृत अंदाजांनुसार हा आकडा २५ आहे) झाल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांनी दिल्या, परंतु अधिक सखोल तपास केला नाही. कॅगच्या अहवालात नोंदवण्यात आलेल्या पद्धतशील प्रश्नांऐवजी सत्ताधारी भाजप आणि विरोधी काँग्रेस यांच्यातील आरोप-प्रत्यारोपांवरच माध्यमांचं लक्ष केंद्रीत राहिलं आहे.

हे प्रकरण बाहेर आलं त्याला आता आठ वर्षं पूर्ण होत आहेत. त्यासंबंधी मुख्य गौप्यस्फोट घडवणारा जागल्या सतत टांगत्या तलवारीखाली जगतो आहे आणि 'छोटे मासे' असलेले इतर साक्षीदार व आरोपीही जीव मुठीत घेऊन आहेत. हजारो तरुणांचं भविष्य असुरक्षित बनवणाऱ्या या प्रकरणाचा तपास मात्र दिशाहीन झाला आहे. अपराध्यांना शासन होईल या दृष्टीनं नागरी समाजानंही हा विषय लावून धरलेला नाही. भारतीय राज्यव्यवस्थेमध्ये उत्तरदायित्वाची उणीव आणि बेदरकारपणा किती आहे, हे दाखवणारा व्यापम हा अलीकडच्या काळातला सर्वांत मोठा घोटाळा असावा.

●

# विद्यापीठांमधल्या वेगळ्या वाटांची अडवणूक

*समाजविज्ञानांमधील संशोधनासाठीच्या निधीमध्ये कपात करण्याचं पाऊल अधुदृष्टीचं लक्षण आहे.*

एकूणच सार्वजनिक विद्यापीठांविरोधात आणि खासकरून समाजविज्ञानाच्याविरोधात आक्रमक भूमिका घेण्याचं सत्र गेला काही काळ सुरू आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणाऱ्या निधीमध्ये झालेली कपात, हा यातला अगदी अलीकडचा आक्रमक हल्ला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगानं अकराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२००७-१२) स्थापन केलेली समाजविज्ञानाच्या संशोधन व अध्ययनाची विविध केंद्रं आता तग धरण्यासाठी झगडत आहेत, कारण पंचवार्षिक योजनाच बंद करण्यात आल्या आहेत. या केंद्रांना निधी पुरवण्याच्या बाबतीत आयोगानं अस्थिर भूमिका ठेवल्यामुळं अनेक शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्यासमोर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे, त्याचसोबत उदयोन्मुख विद्याशाखा व संभाषितांच्या अस्तित्त्वाला धोका निर्माण झाला आहे.

भारतातील महत्त्वाच्या सार्वजनिक विद्यापीठांमध्ये स्थापन झालेली ही समाजविज्ञान संशोधन केंद्रं विविध पातळ्यांवर सरकारी निधीवर अवलंबून आहेत. काही ठिकाणी या केंद्रांचं रूपांतर विद्यापीठाच्या विभागामध्ये करण्यात आलं आहे. काही ठिकाणी राज्य सरकारं व इतर स्त्रोतांकडून त्यांना निधी मिळालेला आहे. परंतु, ज्या विद्यापीठांमध्ये अशी केंद्रं पूर्णपणे नियोजित सरकारी निधीवर अवलंबून आहेत तिथं एकतर ती बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे किंवा त्यांच्या क्षमतेमध्ये कपात करावी लागणार आहे.

सरकारी निधीमधील कपातीचा परिणाम लगेच गेल्या महिन्यात दिसून आला. टाटा समाजविज्ञान संस्थेच्या प्रशासनानं संस्थेतील प्रगत स्त्री-अभ्यास केंद्र, सामाजिक वगळणूक व समावेशक धोरणविषयक अभ्यास केंद्र, आणि मानवाधिकार शिक्षणासाठी सर्वोत्कृष्टता केंद्र इथल्या काही शिक्षकांना व संशोधकांना सेवामुक्तीची पत्रं दिली. या संदर्भात प्रसारमाध्यमांमध्ये झालेली चर्चा आणि लोकांनी केलेली टीका यांमुळं विद्यापीठ अनुदान आयोगानं नियोजित निधीला वर्षभराची मुदतवाढ दिली, आता याअंतर्गत सुरू असलेल्या सर्व योजनांना ३१ मार्च २०१८पर्यंत निधी मिळत राहील. परिणामी, टाटा समाजविज्ञान संस्थेनं आधी पत्रं पाठवलेल्या बहुतांश शिक्षक-संशोधकांना पुन्हा सेवेत घेतलं. या तात्पुरत्या उपायामुळं विरोधही तात्पुरता मावळला असला तरी या केंद्रांच्या दीर्घकालीन भविष्याविषयीचा व्यापक प्रश्न मात्र अनुत्तरितच राहिला आहे.

स्त्री-अभ्यास केंद्रांची स्थापना काही विद्यापीठांमध्ये १९७०च्या दशकाच्या पूर्वार्धात झालेली आहे, परंतु त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाचं पाठबळ १९८०च्या दशकाच्या मध्यात मिळू लागलं. अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये समावेशकतेची बाजू लावून धरण्यात आली आणि विशेष शिक्षणाच्या या केंद्रांची स्थापना व विस्तार करण्याला मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात आली. शिवाय, ही केंद्रं संपूर्ण विद्याशाखा म्हणून विकसित करून तिथं अध्ययन, संशोधन व पूरक कामकाज व्हावं यालाही प्रोत्साहन देण्यात आलं. स्त्री-अभ्यास, सामाजिक वगळणूक व मानवाधिकार अभ्यास यांना या विस्तारामध्ये स्थान देण्यात आलं. उदाहरणार्थ, स्त्री-अभ्यास केंद्रांना देण्यात आलेल्या सूचनांमध्ये 'आंतरविद्याशाखीय चौकट', 'इतर विद्याशाखांच्या परिवर्तनासाठीचा दृष्टिकोन' विकसित करणं, 'धोरणनिर्मिती'ला सजग बनवणं, आणि 'दलित, आदिवासी, श्रमिक व धार्मिक समुदायां'सह

सर्वांत परिघावरील समुदायांमधील स्त्रियांना 'संशोधन व धोरण क्षेत्रांमध्ये अधिक अस्तित्त्व' मिळवून देणं अशा सूचनांचा समावेश होता. या केंद्रांनी नवीन आणि महत्त्वाचा संशोधनविषयक कार्यक्रम पुढं आणला. नवीन शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी यांनी जात, वर्ग आणि लिंगभाव यांच्याविषयी आंतरस्तरीय दृष्टिकोनांनी काम केल्यामुळं हे साध्य झालं.

'समाजविज्ञानं कितपत समतावादी आहेत?' असा सवाल समाजवैज्ञानिक गोपाळ गुरू यांनी 'इपीडब्ल्यू'मधील एका लेखात विचारला होता (१५ डिसेंबर २००२). अकादमिक व संस्थात्मक रचनांमधील सांस्कृतिक उतरंडीबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. समाजविज्ञानांच्या 'संकल्पना अवकाशाचा सामाजिक पाया विस्तारण्या'ची गरज असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. अशा अकादमिक पर्यावरणात ही अभ्यासकेंद्रं स्थापन करण्यात आली आणि ती कार्यरतही राहिली होती. पारंपरिक समाजविज्ञानाच्या विद्याशाखांसमोर आणि अभ्यासासमोर त्यांनी ज्ञानशास्त्रीय आव्हान उभं केलं होतं. सिद्धान्त विरुद्ध व्यवहार, रचना विरुद्ध माध्यम, आणि डावं विरुद्ध उजवं राजकारण या पारंपरिक विभागण्यांचा त्यांनी पुनर्विचार केला. उदाहरणार्थ, पुण्यातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री-अभ्यास केंद्रासारख्या केंद्रांनी पर्यायी शिक्षणशास्त्रीय पद्धती व स्त्रोत तयार केले, जेणेकरून आजतागायत अभ्यासविषय ठरलेल्या परिघावरील समुदायांमधून पुढं आलेल्या अभ्यासकांना यात समाविष्ट करता येईल.

या आंतरविद्याशाखीय केंद्रांच्या स्थापनेसोबतच केंद्रीय शिक्षणसंस्थांमध्ये २००७ साली मागासजातींना आरक्षण देण्यात आलं, केंद्रीय शिक्षणसंस्था (प्रवेशावेळी आरक्षण) अधिनियम, २००६ अनुसार एकूण पटसंख्येतही वाढ करण्यात आली. आरक्षणामुळं उच्चशिक्षणातील विद्यार्थ्यांच्या लोकसांख्यिकीमध्ये आणखी वैविध्य आलं. जात, पितृसत्ता, मुख्यप्रवाहातील संभाषितं आणि राज्यसंस्थेकडून होणारं दमन या संदर्भातील प्रश्नांना नवीन विचारसरणीय ऊर्जा पुरवण्याचं काम या नव्यानं स्थापन झालेल्या केंद्रांनी केलं. 'जस्टीस फॉर रोहित वेमुला' (दलित जातींमधील विद्यार्थ्यांना सामोरं जाव्या लागणाऱ्या संस्थात्मक भेदभावाविरोधी कार्यरत गट), 'पिंजरा तोड' (वसतिगृहांमधे व आवारांमधे विद्यार्थिनींवर लिंगभावकेंद्री टेहळणीविरोधी कार्यरत गट), 'होको कोलोरोब' (जादवपूर विद्यापीठातील विद्यार्थिनींच्या छेडछाडीविरोधातील गट) अशा प्रकारच्या विद्यार्थीगटांची वाढ होण्यामागेही या केंद्रांचा संदर्भ आहे. अलीकडेच 'इंडियन इन्स्टिटट्यूट ऑप टेक्नॉलॉजी, मद्रास' इथं 'आंबेडकर पेरियार स्टडी सर्कल' या गटाची मान्यता काढून घेण्यात आली होती. विद्यार्थी संभाषितांमध्ये व राजकारणामध्ये लिंगभाव आणि जातीच्या मुद्द्यांना या चळवळींनी पुढं आणलं आहे, प्रस्थापित विद्यार्थी संघटनांच्या संघटनात्मक तत्त्वांवर आणि नेतृत्वावर प्रश्नचिन्हं उमटवली आहेत, आणि इतर केंद्रीय व राज्य विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांसोबत स्वायत्त अवकाश व ऐक्य निर्माण केलं आहे.

समाजविज्ञान केंद्रांनी एक वर्षांची मुदतवाढ दिल्यामुळं विद्यार्थी-शिक्षक आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्यातील पेचप्रसंगावर तात्कालिक उपाय साधला जणार आहे. अधिक समता व प्रतिनिधित्व मिळण्याच्या दृष्टीनं प्रस्थापित संभाषितं व शिक्षणसंस्थांमध्ये परिवर्तन घडवणाऱ्या चिकित्सक संशोधकीय कार्यक्रमाला यातून धोका निर्माण झाला आहे. नियोजन कालावधी संपुष्टात आला असला तरी सरकारी निधीद्वारे या संशोधकीय कार्यक्रमाचं संरक्षण करायला हवं. अशा केंद्रांच्या अस्तित्त्वामुळं आणि विस्तारामुळं भारतीय विद्यापीठं

**(पान २७ वर पाहा)**

त्यावेळचे सेनाप्रमुख यित्झाक राबिन (जे नंतर इस्रायलचे पंतप्रधान झाले) आणि त्या युद्धातले इतर जनरल अशा सर्वांच्या चेहऱ्यावर युद्ध जिंकल्याचा आनंद ओसंडून वाहताना दिसत होता. बैठक जवळजवळ संपत आली होती. शेवटी मात्ती पेलेड बोलायला उभे राहिले. आता आपण आणि पॅलेस्टिनी असे समोरासमोर आलो आहोत. आपल्यात फूट पडायला दुसरे कोणी अरब देश नाहीत. आता पॅलेस्टिनीना त्याचं स्वत:चं राज्य उभारू देण्याची ही उत्तम संधी आहे. एक स्थिर ज्युईश लोकशाही इथे रुजवण्याचं आपलं लक्ष्य असेल तर वेस्ट बँक परिसर आणि त्यातली माणसं यांच्यावर दीर्घकाळ कब्जा करून राहणं हे त्याच्या विरुद्ध जाणारं आहे असं मत पुढे मात्ती पेलेडनी नोंदवलं. आपण त्यांच्या जमिनींवर ताबा ठेवला तर तिथे जनप्रतिकाराची आंदोलनं उभी राहतील आणि आपल्या लष्कराची सगळी ताकद त्यांच्याबरोबर लढण्यात आपल्याला खर्च करावी लागेल. ज्युईश शासन हे कब्जा करणारी (परकी) शक्ती म्हणून तिथे काम करील आणि त्यातून दोन (अलग आणि विरोधी) राष्ट्रांची संकल्पना तयार होईल असं त्यांचं मत त्यांनी नोंदवलं.

बाकीचे सारे जनरल मात्ती पेलेड यांचं म्हणणं शांतपणे ऐकून घेत होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे फक्त वेस्ट बँक आणि गाझा पट्टी एवढ्यावर पॅलेस्टिनीचं समाधान होणार नाही. ते बरंच काही मागतील. यावर मात्ती पेलेडनी आपली असहमती व्यक्त केली आणि आपल्या गुप्तचरांचा दाखला दिला आणि त्यांचं मत आपल्यासारखंच आहे असं सांगितलं. पण यामुळे काही फरक पडेना. शेवटी सेनाप्रमुख यित्झाक राबिन पेलेडना बाजूला घेऊन गेले आणि 'आताचं वातावरण अशा मुद्द्यांची चर्चा करण्यासाठी अनुकूल नाही' असं त्यांना सांगून त्यांनी तो विषय तिथेच थांबवला.

एकीकडे प्रस्थापित इस्रायली राज्यकर्ता वर्ग, त्याचे पाठीराखे ज्यू आणि दुसरीकडे मात्ती पेलेड असा नेमका भेद कोणता होता हे समजण्यासाठी ही गोष्ट पुरेशी आहे. आणि पुढच्या काळात मात्तीनी जे निर्णय घेतले त्यांच्यावर प्रकाश टाकणारे आहेत.

एक यशस्वी सेनानी म्हणून मात्ती पेलेड हे इस्रायलमध्ये प्रसिद्ध आहेत आणि तिथल्या ज्यूंच्या मनात पेलेड यांच्याबद्दल आदराची भावना आहे. पण पेलेड यांची गोष्ट इथेच संपत नाही. इस्रायली सैनिकांनी पॅलेस्टिनी नागरिकांचं जे शिरकाण केलं त्याने मात्ती पेलेड अस्वस्थ झाले. इस्रायलने कब्जा केलेल्या प्रदेशात – म्हणजे वेस्ट बँक आणि गाझा पट्टी या प्रदेशांत – इस्रायली सैन्य दीर्घकाळ राहिलं तर त्याचे जे गंभीर परिणाम होतील असं पेलेडना वाटत होतं त्या परिस्थितीत सैन्यात राहणं हे त्यांच्या विवेकबुद्धीला पटणारं नव्हतं. ज्यूंचं राज्य स्थापन झाल्यावर आता पॅलेस्टिनींच्या समस्येवर तोडगा काढून स्थायी शांतता निर्माण करणं त्यांना आवश्यक वाटत होतं. आणि इस्रायलींचं आक्रमक आणि उद्दाम वागणं त्यांना योग्य वाटत नव्हतं. ●

---

**(विद्यापीठातील निराळ्या... पान १४ वरून)**

बौद्धिकदृष्ट्या संपन्न बनणार आहेत, कारण या केंद्रांमधून परिघावरील समुदायांमधून ज्ञाननिर्मितीला प्रोत्साहन दिलं जातं. असं करताना, पारंपरिक अध्ययनाच्या रूपांना ही केंद्रं आव्हान देतात, अधिक चिकित्सक पद्धतीनं गोष्टींकडे पाहण्यासाठी व गोष्टी जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांची मनं मुक्त करतात. व्यापक पातळीवर विद्यापीठं आणि शिक्षण यांची पूर्वअट हीच तर असते. ●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.
(८, १५ व २२ एप्रिलच्या अंकांतून)